**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र.३**
**सभावृत्तांत**

दिनांक :- १७/६/२०१५ वेळ :- दु. ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १७/६/२०१५ रोजी दु. ३.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव - अध्यक्ष
२. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३. मा.लोंढे गणेश नारायण
४. मा.शमीम पठाण
५. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
६. मा. शिदे शितल उर्फ विजय गोरख
७. मा.साबळे छाया जगन्नाथ
८. मा.जगताप विमलताई सुरेश
९. मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
१०. मा.बारणे निलेश हिरामण
११. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
१२. मा.बारणे माया संतोष
१३. मा.पवार यमुनाताई रमणनाना
१४. मा.कलाटे स्वाती मयूर

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. खांडकेकर - .क्षेत्रिय अधिकारी, मा.रविंद्र जाधव प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा.सतिश गोरे – पशुवैदयकिय अधिकारी, मा.देवन्ना गट्टुवार - कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा.एस.एस.मोरे – कार्यकारी अभियंता विदयुत , मा.सी.एन.धानोरकर – उपअभियंता, स्थापत्य , मा.एन.आर.निंबाळकर – उपअभियंता स्थापत्य, मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य, मा.एस.वाय.पाटील- उपअभियंता, पाणीपुरवठा, मा.सुधाकर कुदळे – उपअभियंता, जलनिसारण विभाग मा.ई.बी.पाटील उपअभियंता, विदयुत विभाग, ,मा.वैभव कुसाळकर, उपअभियंता, उदयान विभाग, मा.मिनानाथ इनामदार – लेखाधिकारी, मा.के.डी.दरवडे – सहा.आरोग्याधिकारी, मा.आर.एन.भाट – मुख्य आरोग्य निरिक्षक, मा. डी.एन.आढळे – उदयान निरिक्षक, श्री.फाटक डी.डी. कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग, श्री.सी.एल.मुठाळ, कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. २, दि.२०/५/२०१५, रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

तदनंतर **उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक २ ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत होणा-या विविध कार्यक्रमासाठी तात्पुरती धवनिक्षेपण , प्रकाश व जनरेटरची व्यवस्था करणेकामी येणा-या रक्कम रुपये १०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३ चिंचवड उपविभागात होणा-या विविध कार्यक्रमासाठी तात्पुरते ध्वनीक्षेपण , प्रकाश व जनरेटरची व्यवस्था करणेकामी येणा-या रक्कम रुपये १०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ४ दिनांक २०/५/२०१५ रोजीच्या कार्यपत्रीका क्रमांक २ मधील ठराव क्रमांक ८ , विषय क्रमांक ६ च्या विषयास अनुसरुन झालेल्या ठरावात गांधीपेठ चिंचवड गांव येथील प्रभाग क्रमांक २२ मधील जुनी मुतारी निष्काषीत करुन तेथे मनपाच्या वतीने सार्वजनिक वाचनालय उभारणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ५ थेरगांव गावठाण येथील जगतापनगर भागातील स.नं.४ व गावठाणामधून जाणा-या रस्त्याला ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै.गोविंद बालाजी जगताप असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ६ पिंपरी चिंचवड लिंकरोड येथे पिंपरी भाटनगरकडून चिंचवडकडे येणा-या रस्त्याला पिंपरीतील थोर सामाजिक कार्यकर्ते तवेच पिंपरी चिंचवड मनपाचे प्रथम उपाध्यक्ष कै.चेतनदास मेवाणी असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ७ पिंपरी चिंचवड लिंकरोड येथे श्री गजानन महाराज मंदिर येथे सप्ताहात दर गुरुवारी मोठया प्रमाणात नागरीकांची गर्दी असते. त्यामुळे लिंकरोड येथे गुरुवारच्या दिवशी खुप गर्दी होऊन नागरीक रस्त्यावर दुचाकी व चारचाकी वाहने पार्किंग करत असल्याने रहदारीस अडथळा निर्माण होतो सदर ठिकाणी पाहणी करुन फुटपाथला गुरुवारच्या दिवशी दुचाकी पार्किंग करीता गाडी वर खाली येण्याकरीता रॅम्प बनविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ८ चिंचवड माणीक कॉलनी (प्रभाग क्रमांक २४) येथे मनपातर्फे व्यायाम शाळा विकसीत केलेली आहे. सदर व्यायाम शाळेकडे पुर्णत: दुर्लक्ष झालेले असून, व्यायामाचे साहित्य अस्ताव्यस्त धुळ खात पडलेले आहे. तरी सदर व्यायाम शाळा नव्याने विकसीत करणे आणि सदर व्यायाम शाळा संस्थेस किंवा मंडळास देखभाल करणेकामी किमान सेवा शुल्क दरात देण्यासंबंधी विंचार करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ९ प्रभाग क्रमांक ५२ (ताथवडे पुनावळे) मधून ताथवडे ते लोहगांव हा बस मार्ग चालु करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक १० थेरगांव येथील स.नं.२२/५ मधील क्षेत्र १ हेक्टर ०० आर या मिळकतीचा आगाऊ ताबा पिंपरी चिंचवड मनपास अ, ब पत्राव्दारे आरक्षण क्रमांक ६२८ खेळाचे मैदानसाठी दिलेले आहे. सदर खेळाचे मैदानास कै.रामभाऊ मोरु बारणे व कै.बारकु मोरु बारणे असे नांव देवून नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

ठराव क्र. ९ | विषय क्र. १

दि. १७/६/२०१५ | विभाग स्थापत्य –ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.माया बारणे | अनुमोदक: मा. झामाबाई बारणे

संदर्भ :- मा.माया बारणे यांचा दिनांक २५/५/२०१५ रोजीचा प्रस्ताव

लक्ष्मणनगर येथील सब-वेचे नामकरण कै.नरहरी नामदेव गुजर, गुजरनगर , थेरगांव असा ठराव मंजूर करण्यात आला होता. त्याचबरोबर त्या सब-वे चे कै.पंडीत तुकाराम गुजर, गुजरनगर थेरगांव असे नामकरण करणेत यावे. त्याचप्रमाणे बेलठिकानगर च्या रस्त्यास शि वांकुर कॉलनी बेलठिकानगर थेरगांव असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १० | विषय क्र. २

दि. १७/६/२०१५ | विभाग विदयुत –ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.शमीम पठाण | अनुमोदक: मा. झामाबाई बारणे

संदर्भ :- क्र.बक्षे/वि/जा/२२/२०१५, दिनांक १६/६/२०१५ अन्वये मा.क्षेत्रीय अधिकारी यांचा प्रस्ताव..

ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत होणा-या विविध कार्यक्रमासाठी तात्पुरती धवनिक्षेपण , प्रकाश व जनरेटरची व्यवस्था करणेकामी येणा-या रक्कम रुपये १०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्र. ११ | विषय क्र. ३

दि. १७/६/२०१५ | विभाग विदयुत –ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.आश्विनी चिंचवडेपाटील | अनुमोदक: मा.विमलताई जगताप

संदर्भ :- क्र.बक्षे/वि/जा/२१/२०१५, दिनांक १६/६/२०१५ अन्वये मा.क्षेत्रीय अधिकारी यांचा प्रस्ताव..

चिंचवड उपविभागात होणा-या विविध कार्यक्रमासाठी तात्पुरते ध्वनीक्षेपण , प्रकाश व जनरेटरची व्यवस्था करणेकामी येणा-या रक्कम रुपये १०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १२ विषय क्र. ४
दि. १७/६/२०१५ विभाग स्थापत्य –ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.आश्विनी चिंचवडेपाटील अनुमोदक: मा.विमलताई जगताप

संदर्भ :- मा.आश्विनी चिंचवडेपाटील यांचा दिनांक १७/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव

दिनांक २०/५/२०१५ रोजीच्या कार्यपत्रीका क्रमांक २ मधील ठराव क्रमांक ८ , विषय क्र. ६ च्या विषयास अनुसरुन झालेल्या ठरावात गांधीपेठ चिंचवड गांव येथील प्रभाग क्र. २२ मधील जुनी मुतारी निष्काषीत करुन तेथे मनपाच्या वतीने सार्वजनिक वाचनालय उभारणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १३ विषय क्र. ५
दि. १७/६/२०१५ विभाग स्थापत्य –ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.विमलताई जगताप अनुमोदक: मा.संपत ज्ञानोबा पवार

संदर्भ :- मा.विमलताई जगताप यांचा दिनांक १७/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

थेरगांव गावठाण येथील जगतापनगर भागातील स.नं.४ व गावठाणामधून जाणा-या रस्त्याला ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै.गोविंद बाळाजी जगताप असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १४ विषय क्र. ६
दि. १७/६/२०१५ विभाग स्थापत्य –ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. शितल उर्फ विजय शिंदे अनुमोदक: मा.संपत ज्ञानोबा पवार

संदर्भ :- मा. शितल उर्फ विजय शिंदे यांचा दिनांक १७/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड लिंकरोड येथे पिंपरी भाटनगरकडून चिंचवडकडे येणा-या रस्त्याला पिंपरीतील थोर सामाजिक कार्यकर्ते तसेच पिंपरी चिंचवड नपाचे प्रथम उपाध्यक्ष कै.चेतनदास मेवाणी यांचे नांव दिल्यास एका सामाजिक कार्यकर्त्याला मान मिळेल. सबब सदर रस्त्यास स्वर्गीय चेतनदास मेवाणी असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्र. १५ विषय क्र. ७
दि. १७/६/२०१५ विभाग स्थापत्य –ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. शितल उर्फ विजय शिंदे अनुमोदक: मा.संपत ज्ञानोबा पवार

संदर्भ :- मा. शितल उर्फ विजय शिंदे यांचा दिनांक १७/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड लिंकरोड येथे श्री गजानन महाराज मंदिर येथे सप्ताहात दर गुरुवारी मोठया प्रमाणात नागरीकांची गर्दी असते. त्यामुळे लिंकरोड येथे गुरुवारच्या दिवशी खुप गर्दी होऊन नागरीक रस्त्यावर दुचाकी व चारचाकी वाहने पार्किंग करत असल्याने रहदारीस अडथळा निर्माण होतो. याठिकाणी रस्त्यालगत चालण्यासाठी फुटपाथ बनविण्यात आला आहे. परंतु या फुटपाथचा चालण्यासाठी उपयोग केला जात नाही. तरी याठिकाणी पहाणी करुन फुटपाथला गुरुवारच्या दिवशी दुचाकी पार्किंगकरीता गाडी वर खाली येण्याकरीता रॅम्प बनविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १६ विषय क्र. ८

दि. १७/६/२०१५ विभाग १) स्थापत्य –ब क्षेत्रीय कार्यालय
२) क्रिडा विभाग

सुचक : मा. शितल उर्फ विजय शिंदे अनुमोदक: मा.संपत ज्ञानोबा पवार

संदर्भ :- मा. शितल उर्फ विजय शिंदे यांचा दिनांक १७/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड माणीक कॉलनी येथे पिंपरी चिंचवड मनपातर्फे व्यायामशाळा विकसीत करणेत आली आहे. परंतु सध्या या व्यायाम शाळेकडे पुर्णत: दुर्लक्ष झालेले असून, आतील व्यायामाचे साहीत्य अस्ताव्यस्त धुळ खात पडलेले आहे. सद ठिकाणी पहाणी करुन व्यायाम शाळा नव्याने विकसीत करणे तसेच सदर व्यायामशाळा संस्थेस किंवा मंडळास देखभाल करणेकामी किमान सेवाशुल्क दरात देण्यासंबंधीचा विचार करण्यात यावा. सदरचा विषय क्रिडा कला सांस्कृतिक विभाग समिती संबंधीत असलेने सदर समितीच्या मान्यतेकामी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १७ विषय क्र. ९

दि. १७/६/२०१५ विभाग -पुणे महानगर परिवहन महामंडळ, लि

सुचक : मा. झामाबाई बारणे अनुमोदक: मा.शमीम पठाण

संदर्भ :- मा. यमुनाताई पवार यांचा दिनांक १७/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहर हे औदयोगीक नगरी म्हणून ओळखले जाते. प्रभागातील नागरीक हे ताथवडे ते लोहगाव हा बस मार्ग चालु करणेबाबत विनंती करीत असतात. तरी सदर बससेवा चालु करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १८ विषय क्र. १०

दि. १७/६/२०१५ विभाग १) स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
२) क्रिडा विभाग

सुचक : मा. झामाबाई बारणे अनुमोदक: मा. माया संतोष बारणे

संदर्भ :- मा.झामाबाई बारणे यांचा दिनांक १७/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

श्री.ज्ञानेश्वर रामभाऊ बारणे, तुकाराम रामभाऊ बारणे, दिलीप रामभाऊ बारणे, सुनिल बारकु बारणे, श्री.संतोष बाळु बारणे रा.थेरगांव ता.मुळशी जि.पुणे यांनी मा.आयुक्त यांचेकडे २/५/२०१५ अन्वये मा.आयुक्त ,पिंपरी चिंचवड मनपा यांना केलेल्या अर्जानुसार आरक्षण क्रमांक ६२८ खेळाचे मैदान गांव मौजे-थेरगांव ता.मुळशी जि.पुणे येथील स.न. २२/५ मधील १ हेक्टर ०० आर या मिळकतीचा आगाऊ ताबा पिंपरी चिंचवड मनपास अ व ब पत्राव्दारे पुर्वीच दिलेला आहे. या विनंती अर्जानुसार ज्या जमीन मालकांच्या मालकीची जमीन आहे त्यांच्या विनंतीनुसार सदरहू आरक्षण क्रमांक ६२८ खेळाचे मैदानास कै.रामभाऊ मोरु बारणे व कै.बारकु मोरु बारणे असे नाव देवून नामकरणाचा विषय मा.प्रभाग समितीपुढे आला असता , सदर आरक्षण क्रमांक ६२८ खेळाचे मैदानास यापुर्वीच मा.ब प्रभाग समिती ठराव क्रमांक ३३ दिनांक ३०/१/२०१५ अन्वये मान्यता दिली असल्याने , सदरचा विषय तहकुब ठेवणेत येत आहे

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ ११२ /२०१५.
दिनांक : १० /०७ /२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना